सत्यमेव जयते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/ २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

## महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील युवक-युवतींसाठी बँक, रेल्वे, एल.आय.सी. इ.मध्ये लिपिक वर्गीय स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी मोफत अनिवासी प्रशिक्षण कार्यक्रम

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील युवक – युवतींसाठी **कोल्हापुर जिल्ह्याकरीता १५० विद्यार्थ्यांना व गोंदिया जिल्ह्याकरीता १५० विद्यार्थ्यांना आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी नि:शुल्क आणि अनिवासी** प्रशिक्षणाकरीता या दोन जिल्ह्याच्या ठिकाणी खालील नमूद प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | प्रशिक्षण संस्थेचे नाव व जिल्ह्याचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १. | सेवा सामाजिक विकासा संस्था, कोल्हापूर | ७५ |
| २. | प्रबोधन बहुउद्देशीय संस्था संचलित स्पेक्ट्रम ॲकॅडमी, कोल्हापूर | ७५ |
| ३. | प्रबुध्द विनायति कल्याणकारी संस्था, गोंदिया | ७५ |
| ४. | करीअर कॅम्पस संस्था, गोंदिया | ७५ |
| | एकूण | ३०० |

**पात्रता :**

१) अर्जदार महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा असावा.
२) अर्जदाराचे वय १८ ते ३४ पर्यन्त असावे.
३) अर्जदार किमान १२ वी उतीर्ण असावा.
४) उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**विद्यार्थी निवडीचे निकष :**

- प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने गुणवत्ता यादीतील रु.८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेल्या सर्व पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव
- ४ % जागा दिव्यांगाकरीता राखीव
- ५% जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग,मादगी,इ.)
- १% जागा अनाथ उमेदवारांसाठी राखीव.
- एकूण जागेच्या ५ % जागा विशेषबाब म्हणून राखीव.

**चाळणी परीक्षेचे स्वरूप :**

- संबंधित पूर्व प्रशिक्षण आय.बी.पी.एस., एल.आय.सी., रेल्वे, बँक लिपीक व त्या समकक्ष पदाच्या परीक्षेच्या धर्तीवर असेल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन नोंदणी करण्याची शेवटची तारीख २६/१०/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी – ६ महिने (अनिवासी)
- निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्यास त्या विद्यार्थ्यांना दरमहा रु.६०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल.
- निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरीता प्रती विद्यार्थी रु.५०००/- एवढी रक्कम अदा करण्यात येईल.
- सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवरांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

- **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दि.११/१०/२०२३ पासून** https://docs.google.com/forms/d/1vf-Tjs1PUqduHZwFnW2ewlltNXr8Freb86qBqm8taM/edit **या लिंकवर ऑनलाईन अर्जाची नोंदणी करावी.**

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**